**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**History of Marathi Literature**
**(Paper – IV)**
**{ 11th April 2016 }**

**Q.P. Code : 27173**

**(3 तास)** **एकूण गुण :१००**

**सूचना :** (१) प्रश्न क्रमांक १ ते ८ पैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(२) प्रश्न क्रमांक ९ सोडविणे **आवश्यक** आहे.
(३) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.
(४) एकूण **पाच** प्रश्न सोडवा.

१. महानुभाव गद्य आणि पद्य साहित्याचे स्वरूप व वैशिष्ट्ये साधार विशद करा.

२. वारकरी संप्रदायाच्या काव्यलेखनाच्या प्रेरणा सांगून, त्यांचे सामाजिक योगदान स्पष्ट करा.

३. पंडिती काव्याचे स्वरूप सांगून, पंडिती काव्याच्या गुण दोषांची साधार चर्चा करा.

४. ''वीर आणि शृंगार रसांना प्राधान्य देवून शाहिरी कवितेने मराठी कवितेला लौकिक पातळीवर आणले''. या विधानाचा साधार परामर्श घ्या.

५. नाथ, दत्त, समर्थ आणि लिंगायत पंथीयांचे लेखन 'भक्ती' या प्रेरणेतून कसे झाले आहे, ते साधार लिहा.

६. मराठी साहित्यात इतर धर्मियांनी लेखन करून मोठे योगदान दिले आहे, ते त्यांच्या ग्रंथलेखनाच्या आधारे स्पष्ट करा.

७. मध्ययुगीन मराठी साहित्येतिहासातील विविध साहित्य प्रकारांचा साधार परिचय करून द्या.

८. बखर वाङ्मयाचे स्वरुप व प्रकार सांगून, पेशवे कालीन बखरींची सविस्तर माहिती लिहा.

९. खालील प्रत्येक गटातील प्रत्येकी दोन टीपा लिहा. **(एकूण चार)**

**'अ' गट**

(१) विवेकसिंधू
(२) एकनाथांची भारूडे
(३) दासबोध
(४) रघुनाथाचे-दमयंतीस्वयंवर

**'ब' गट**

(१) म्हाइंमट
(२) तुकाराम
(३) वामन पंडित
(४) होनाजी-बाळा

---

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Theory of Literature & Literary Criticism**
**(Paper – V)**
**{ 12th April 2016 }**

**QP Code : 27276**

(3 Hours) [ Total Marks : 100

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

१. (अ) भरतमुनींचे रसविषयक सूत्र सविस्तर स्पष्ट करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा :
(क) अलंकाराचे काव्यातील स्थान
(ख) भरताच्या रससूत्रातील व्यभिचारीभाव.

२. (अ) ॲरिस्टॉटलचे साहित्याच्या स्वरूपाविषयीचे विचार, अनुकृती सिद्धांताच्या आधारे स्पष्ट करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा :
(क) वामनाच्या रीतिविचारातील अर्थगुण
(ख) वक्रोक्तिचे प्रकार.

३. (अ) साहित्याची भाषा म्हणून लक्षणाशक्तीचे स्वरूप व प्रकार स्पष्ट करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा :
(क) साहित्याच्या भाषेतील प्रतिमेचे स्वरूप
(ख) काव्यातील मुक्तछंद.

४. (अ) साहित्यनिर्मितीप्रक्रियेतील प्रतिभेचे स्वरूप सविस्तर विशद करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा :
(क) अभिनवगुप्ताच्या प्रतिभेच्या व्याख्येचे स्पष्टीकरण
(ख) प्रथम श्रेणीची कल्पनाशक्ती.

५. (अ) भारतीय साहित्यशास्त्रातील मम्मटाने व अभिनवगुप्ताने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांची चर्चा करा. १२

किंवा

(आ) टिपा लिहा :
(क) सामाजिक बांधिलकी
(ख) भामहाची काव्यप्रयोजने.

६. (अ) रसप्रक्रियेच्या संदर्भात अभिनवगुप्त यांनी सांगितलेली रसविघ्ने सविस्तर विशद करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा :

(क) कॅथार्सिस – एक विरेचनवादी भूमिका.

(ख) रिचर्ड्सचा प्रेरणासंतुलनाचा सिद्धांत.

७. (अ) साहित्यसमीक्षा प्रक्रियेतील विश्लेषण व मूल्यमापन या घटकांचे महत्त्व विशद करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा :

(क) साहित्यसमीक्षेचे कार्य

(ख) वाङ्मयीन निकष.

८. पुढीलपैकी कोणत्याही **सोळा** प्रश्नांची पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा :- १६

(क) 'काव्यंम् ग्राह्यम् अलंकारात् । सौंदर्यम् अलंकार ।' ही व्याख्या कोणी सांगितली आहे ?

(ख) काव्यनिर्मितीचे जनक कारण कोणते ?

(ग) 'ध्वनी हा काव्याचा आत्मा आहे' असे कोणी म्हटले आहे ?

(घ) उत्प्रेक्षा म्हणजे काय ?

(च) अभिधा म्हणजे काय ?

(छ) कुंतकाने कोणता विचार मांडला ?

(ज) कॅथार्सिस ही संकल्पना कोणी मांडली ?

(झ) 'पूर्ववासनागुणानुबंधी' अशी प्रतिभेची व्याख्या कोणी केली आहे ?

(ट) क्षेमेंद्राच्या कोणत्याही एका ग्रंथाचे नाव लिहा.

(ठ) 'रसगंगाधर' या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(ड) कोणतेही चार स्थायी भाव सांगा.

(ढ) अनुभाव म्हणजे काय ?

(ण) 'सदयःपरनिर्वृतये' म्हणजे काय ?

(त) प्रतिभेला 'वेडाची बहीण' असे कोणी म्हटले आहे?

(थ) वामनाने कोणत्या रीति मांडल्या आहेत ?

(द) सर्जक अनुकृतीची संकल्पना कोणी मांडली ?

(ध) 'संभावनाविरह' म्हणजे काय ?

(त) भरतमुनींचे रससूत्र लिहा.

(थ) 'ध्वन्यालोक' या ग्रंथाचा कर्ता कोण ?

(द) प्रीती आणि कीर्ती ही काव्यप्रयोजने कोणी सांगितली आहेत ?

---

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Literature and Society (Rev)**
**(Paper – VI)**
**{ 13th April 2016 }**

**QP Code : 27396**

( सुधारित अभ्यासक्रम )

(2½ Hours) [ Total Marks : 80

सूचना (१) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० (प्रत्येक प्रश्नास २५ गुण) आहेत.

१. साहित्यनिर्मितीला सामाजिक परिस्थितीचे घटक कारणीभूत ठरतात, या विधानाची चर्चा करा.

किंवा

साहित्य हे सामाजिक बदलाचा परिणाम आहे आणि कारणही आहे कसे ते स्पष्ट करा.

२. आपल्या स्त्रीत्वाचा लौकीक पातळीवर सूड घेऊ पाहणाऱ्या स्त्री ची कथा म्हणजे 'सूड' उदाहरणासह स्पष्ट करा.

किंवा

'शोषित, वंचितांच्या वेदनेचे मूळ शोषक सत्तेमध्येच लपलेले आहे.' हे बाबुराव बागुल यांच्या 'सूड' कादंबरीच्या आधारे स्पष्ट करा.

३. ''स्त्रीयांच्या वाटयाला येणाऱ्या दुःखाचे मूळ पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत आहे'' सानियाच्या अवकाश कादंबरीच्या आधारे स्पष्ट करा.

किंवा

स्त्रीस्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या समाजातील जुनाट संकेतांचे दर्शन 'अवकाश' मध्ये कसे घडते ? ते सांगा.

४. ग्रामीण स्त्रीचे दुःख आनंदीच्या रुपाने 'गावठाण' मध्ये साकार झाले आहे कसे ते स्पष्ट करा.

किंवा

'गावठाण' या कादंबरीतून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन कृष्णात खोत कसे घडवितात या विषयी चर्चा करा.

----------------

QP Code : **27393**

**OLD-COURSE**

( 2 ½ तास) **(एकूण गुण :८०**

सूचना : (१) सर्व प्रश्न समान गुण आहेत.

(२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास एकूण गुण १००. (प्रत्येक प्रश्नास २५ गुण) आहेत.

१. साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

'साहित्यातून विविध विचारप्रणाली व मूल्यव्यवस्था व्यक्त होतात' या विधानाचा परामर्श घ्या.

२. 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीचे महानगरीय साहित्य म्हणून मूल्यमापन करा.

**किंवा**

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीतून व्यक्त झालेले एकाकीपणाचे, परात्मतेचे स्वरूप स्पष्ट करा.

३. 'एस ई झेड' या कादंबरीतून व्यक्त झालेल्या कृष्णक संस्कृतीचे, ग्रामसंस्कृतीचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'एस ई झेड' या कादंबरीन उध्वस्त होणाऱ्या ग्रामव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

४. 'तिची कथा' या कथासंग्रहाचे स्त्रीवादी साहित्य म्हणून मूल्यमापन करा.

**किंवा**

'तिची कथा' या कथासंग्रहातील कथांमधून व्यक्त होणारे स्त्रीजीवनाचे स्वरूप स्पष्ट करा.

---------

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Introduction to Linguistics & Outline of Marathi Dramma (Paper – VII)**
**{ April 2016 }**

**QP Code : 27425**

(३ तास) (एकूण गुण : १००

सूचना : (१) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(२) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

१. (अ) मानवी भाषेचे स्वरूप स्पष्ट करून भाषेची कार्ये विशद करा.

**किंवा**

(ब) भाषाअभ्यासाच्या मुख्य पद्धती सांगून ऐतिहासिक भाषाअभ्यास पद्धतीचे महत्व आणि मर्यादा स्पष्ट करा.

२. (अ) स्वन परिवर्तन म्हणजे काय ते सांगून स्वन परिवर्तनाची कारणे सांगा.

**किंवा**

(ब) भाषेतील 'अर्थ' ही संकल्पना स्पष्ट करून अर्थ परिवर्तनाचे विविध प्रकार सांगा.

३. (अ) शब्दजातींच्या पारंपरिक वर्गीकरणाची थोडक्यात मांडणी करून 'क्रियापद' या शब्दजातीची सविस्तर मांडणी करा.

**किंवा**

(ब) प्रयोग म्हणजे काय ते सांगून कर्मणी प्रयोगाच्या दामलेकृत मांडणीचा आढावा घ्या.

४. (अ) विभक्ती म्हणजे काय ते सांगून द्वितीया-चतुर्थी विभक्ती वादाबाबतच्या मतमतांतरांचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) शब्दसिद्धीचे विविध प्रकार सांगून सामाजिक शब्दांची मांडणी सोदाहरण करा.

५. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा.
(१) भाषिक आदान
(२) स्वनिमांचे प्रकार
(३) खंडीत स्वनिम
(४) अर्थ संकोच

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा.
(१) विशेषण
(२) भावे प्रयोग
(३) मराठीची लिंगव्यवस्था
(४) शून्य प्रत्यय

................

**T .Y .B .A.**

**MARATHI LITERATURE**

**The Study of an Author - Jaywant Dalvi (Rev)**

**(Paper – VIII)**

**{ April 2016 }**

**Code : 27560**

**(3 तास)** **एकूण गुण :१००**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

(२) विवक्षित पुस्तकांच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहितांना लेखकाच्या इतर पुस्तकांची योग्य ती उदारहरणे देणे आवश्यक आहे.

१. (अ) विशिष्ट लेखकाचा अभ्यास म्हणजे काय? ते सांगून लेखकाभ्यास पध्दतीचे स्वरूप स्पष्ट करा? २०

**किंवा**

(ब) 'जयवंत दळवी' यांच्या व्यक्तिमत्वाची व त्यांच्या साहित्याची गुण वैशिष्ट्ये तुम्ही अभ्यासलेल्या कलाकृतींच्या आधारे स्पष्ट करा?

२. (अ) 'जयवंत दळवी' यांच्या 'अंधाराच्या पारंब्या' कादंबरीचे कथन व आशय वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा? २०

**किंवा**

(ब) 'अंधाराच्या पारंब्या' या कांदबरीतून जयवंत दळवी यांनी तत्कालीन समाज जीवनाचे वास्तव हुबेहुब रेखाटले आहे' – सविस्तर विवेचन करा.

३. (अ) 'जयवंत दळवी' लिखित 'संध्याछाया' नाटकातील संघर्ष उलगडून दाखवा. २०

**किंवा**

(ब) जयवंत दळवी यांच्या 'संध्याछाया' नाटकाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये व वेगळेपण सविस्तर सांगा?

४. (अ) 'वेचक जयवंत दळवी' या काथासंग्रहातील कथांमध्ये आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने भिन्नता आढळते' – सोदाहरण स्पष्ट करा? २०

**किंवा**

(ब) 'वेचक जयवंत दळळी' या कथा संग्रहाचे वाङ्मयीन मूल्यामापन करा.

५. (अ) 'कोकणी माणूस, त्याच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती आणि कोकणची बोलीभाषा हा जयवंत दळवी यांच्या चिंतनाचा विषय आहे'- 'सारे प्रवासी घडीचे' कलाकृतीच्या आधारे स्पष्ट करा. २०

**किंवा**

(ब) 'जयवंत दळवी' यांच्या 'सारे प्रवासी घडीचे' या कलाकृतीत कोणती वाङ्मयीन गुण-वैशिष्ट्ये जाणवतात ते सविस्तर सांगा?

---

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Translation Theory Essay & Project (Old Course)**
**(Paper – IX)**
**{ April 2016 }**

QP Code : **27684**

नियमित विद्यार्थ्यांसाठी (2½ तास) (गुण ८०
दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांसाठी (३ तास) (गुण १००

सूचना : उजवीकडील **अंक** पूर्ण **गुण** दर्शवितात.

१. (अ) भाषांतर, अनुवाद, रुपांतर व अर्वाचीनीकरण या संकल्पना स्पष्ट करा. व भाषांतराच्या प्रकाराविषयी सविस्तर माहिती द्या. १५

**किंवा**

(आ) भाषांतराची क्षेत्रे सविस्तर स्पष्ट करा.

२. (अ) 'ललित साहित्याच्या भाषांतरात सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाचे असतात' या विधानाची सोदाहरण चर्चा करा. १५

**किंवा**

(आ) भाषाशैली म्हणजे काय ते सांगून ललित साहित्याच्या भाषांतरात शैलीचे महत्त्व स्पष्ट करा.

३. पुढीलपैकी इंग्रजीतील एक, हिंदीतील एक आणि मध्ययुगीन मराठी गद्यापैकी एक अशा एकूण **तीन** उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा. ३०

(अ) What are the minimum requirements of people to help them live like self-respecting human beings? In common parlance, we say roti, kapda aur makan. Though the minimum needs may cover more areas, even food. Clothing and shelter may not be available to several lakhs of people. Merely saying that we have enough food stocks or we are self-sufficient in food will not fill hungry stomachs. Nobody can deny that there are starvation, deaths here and there; add to this the millions of cases of child malnutrition and maternal malnutrition. Have we ever counted the number of street children, picking rags and left-over for a living? Have we ever bothered about the lakhs of migrants who sleep on the pavements and under the flyovers in the cities?

(आ) The word "English"comes from the country of England. The language that we speak today "Modern Englis"is not the same as the English that people used 1500 years ago. That language -Old English - sounded different and its had some different rules of grammer. Modern English has a very big vocabulary. In fact the famous Oxford Dictionary lists over 650,000 different words. A lot of new words come into the language every year. Which words are new and which words are old? The answer is easy - the words for new things are new and the ones for old things are old for example - airport, computer, stereo are new words. Tree, house and mountain are old.

[ TURN OVER ]

(इ) मनुष्य आज भौतिक सुखों के पीछे पडा हुआ है। पैसा सर्वश्रेष्ठ मूल्य बन गया है। क्योंकि पैसोंद्वारा कोई भी चीज खरीदी जा सकती है। श्रमप्रतिष्ठा, इमानदारी, सच्चाई आदि मूल्यों का अंत हो चुका है। धन से मनुष्य की प्रतिष्ठा बढती है। इसलिए सभी धन को चाहते हैं। धन कमाने की होड लग गई है। इसके लिए बेईमानी का रस्ता भी अपना लिया जाता है। किसी भी किमत पर आदमी आज धन कमाने की फिक्र में रहता है। भौतिक सुखों के प्रति अत्याधिक मोह ही भ्रष्टाचार का मूल कारण है। आसमान को छूती हुई महँगाई भी इसका एक और कारण है। भ्रष्टाचार के कारण देश को भारी नुकसान उठाना पड रहा है। भ्रष्टाचार रुपी इस भस्मासूर का अंत हमें बहुत जल्दी करना चाहिए वर्ना वह हमें तथा पूरे राष्ट्र को ही भस्मसात कर देगा।

(ई) 'आदिवासी' समाज ऐसा समाज है जिसके नाम में ही उसकी पहचान छिपी हुई है। आदिवासी शब्द के लिए 'मूलनिवासी' इस शब्द का भी प्रयोग किया जाता है। अर्थात आदिवासी समाज इस भूमि का मूलनिवासी है और वही इस भूमि का उत्तराधिकारी भी है। लेकिन आज हमारे सामने इस मूलनिवासी का चित्र किस प्रकार उभरकर आता है? अर्थात इस मूलनिवासी की आज की स्थिती इतनी दयनीय है कि उसे भोजन के लिए पेट भर अन्न नहीं, शरीर को वस्त्र नहीं, रहने के लिए आवास नहीं, यानी सभी जीवनावश्यक वस्तुओं के अभाव में इनकी जिंदगी गुजर रही है। इन मूलभूत सुविधाओं और आवश्यकताओं के अभाव के कारण यह समाज गरीब, शोषित, पीड़ित, लाचार बना हुआ है और अपनी अस्मिता को खो बैठा है। इतना हीं नही 'आदिवासीयों' पर हम लोगों ने इतना अत्याचार किया है, इतना अमानवीय व्यवहार किया है उनके साथ कि आदिवासी लोग इस बात से अनजान है कि वे इस धरती के मूलनिवासी हैं। वे भूल गये हैं – अपने मूलनिवासी की जड़।

(उ) गावी एकी सेवंतिये वऱ्हाड राहिंले असे : तयांतु गोसावी बीजें केलें : बैसले : गांवीचे वऱ्हाडी तेया साउमें आलें : वाजत गाजत घेउनि गेले : मांडवी वरिलीकडे बैसों घातलें : खालिलीकडे येर वऱ्हाडी बैसले : आधीं गोसावीयांसि चरणक्षाळण केलें : पाठीं येरां वऱ्हाडीयांसि तांबुळें दिधली : गोसावीयां मर्दना दिधली : एरांची आगें उटीलीं: वरीलीकडे ताट गोसावीयासि केलें : खलिलीकडे ठाए एरांसी केले : गोसावीयासि आरोगण जाली : वीडा वोलगवीला : एरां तांबुळें दीधलीं : मग वऱ्हाड जानवसेया निगालें : गोसावी अनुवर्जनाचेनि मीसें नावेक बीजें केलें : वरिलीकडे बैसले : वऱ्हाडा मुळा आलें : तेयासवें गोसावी बीजें केलें : आधीलें दीसीचियापरी अवधी क्रिया परियंत स्वीकारिली : यापरि चाऱ्ही दीस वऱ्हाडीक जाली : चौथां दीसीं : हर ह्मणति 'एराचें मान्ये' हर ह्मणति : 'एराचें मान्ये': ऐसेनि संभ्रमें एरएऱ्हीं वस्त्रें वाइलीं : मग तेथौनि बीजें केलें :।।

(ऊ) मग अंबीनाथा प्रदक्षणा करीतां सुतारू चुना उखरडीत असतिः गोसावी तेयातें पुसीले : 'हां गा चुना कां उखरडीत असा?' : तेहीं म्हणीतलें : ' जी जी : नवा चुना केला ' : सर्वज्ञे म्हणीतले : ' तेयापरिस वर हाचि निका असेः' मग तेहीं चुना जैसा केला तैसा सांघीतला : सर्वज्ञें म्हणीतले : ' मर्दनी उणा : मग चुनें जाति निरूपीली : 'चुना तो ऐसा : खडे ऐसे भाजावे : ऐसी द्रव्यें होआवी : ऐसी मर्दना होआवी : इतुके दींस कुहीजो दीयावा : मग ऐसा वाटावाः मग तो चुना सुनेयां पुढां घालिजेंः दहीभाताचा उंडा म्हणौनि घे : आणिकाची वास पाहे : तो चुना जाला एसे जाणिजे : एसा होय तरि करावा : ना तरि फेडावा ना' : तीहीं ह्मणीतले : 'जी जी हें आम्हीं परीसों नेणों : मग जाणौनि काइ : हे गोसावीचि निरूपा वेंः आणि गोसावीचि परीसवावेः'।।

४. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. ४०

सूचना : १. नियमित विद्यार्थ्यांनी पुढीलपैकी **एका** विषयावर निबंध लिहावा.

२. दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पुढीलपैकी **दोन** निबंध लिहावेत. (गुण ४०)

(१) माझा आवडता लेखक

(२) वाढती मराठी साहित्य संमेलने

(३) दलित साहित्याचे वेगळेपण

(४) मराठी वाङ्मयीन नियतकालिकांची कामगिरी

(५) संत साहित्यः समाजिक संदर्भ

------------

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**History of Marathi Literature**
**(Paper – IV)**
**{ 21st April 2016 }**

QP Code : 27174

(3 Hours) [ Total Marks : 100

सूचना (१) प्रश्न क्रमांक १ ते ८ पैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(२) प्रश्न क्रमांक ९ सोडविणे आवश्यक आहे.
(३) एकूण **पाच** प्रश्न सोडवा.
(४) सर्व प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. 'महानुभावीयांच्या चरित्र ग्रंथांनी मध्ययुगीन मराठी साहित्यात मोलाची भर घातली या विधानाची सत्यता पटवून दया.

२. वारकरी संप्रदायाची परंपरा सांगून त्याचे स्वरुप व कार्य विशद करा.

३. पंडिती काव्याची स्वरुप-वैशिष्टये साधार लिहा.

४. शाहिरी कवितेतून लौकिकतेचे रंग कसे प्रकट झाले आहेत, ते सोदाहरण लिहा.

५. 'भक्ती' हेच समान सूत्र नाथ, दत्त, समर्थ व लिंगायत पंथियांच्या वाङ्मयात कसे दिसून येते' याची साधार चर्चा करा.

६. इतर धर्मियांनी मराठी वाङ्मय कसे समृद्ध केले, ते सोदाहरण लिहा.

७. मध्ययुगीन मराठी साहित्य प्रकारांचा आढावा घ्या.

८. बखर वाङ्मयाच्या प्रेरणा विशद करुन, शिवकालीन बखरीचे स्वरुप स्पष्ट करा.

९. प्रत्येक गटातील दोन टिपा लिहा (एकूण **चार**) :-

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| (१) 'विवेकसिंधू' | (१) चोखामेळा |
| (२) 'भावार्थ-दीपिका' | (२) संत नामदेव |
| (३) भाऊसाहेबांची बखर | (३) शाहीर राम जोशी |
| (४) आज्ञापत्र | (४) फादर स्टीफन्स |

----------------

**FS-Con. 4455-16.**

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Theory of Literature & Literary Criticism**
**(Paper – V)**
**{ 22nd April 2016 }**

Q.P. Code : **27275**

(3 तास) एकूण गुण :१००

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **उजव्या** बाजूस असलेले अंक **गुण** दर्शवितात.

१. (अ) कुंतकाचा वक्रोक्तिविचार समजावून द्या. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२
(१) वामनाचा रीतिविचार
(२) अभिनवगुप्त चा ध्वनिविचार

२. (अ) प्लेटोचा अनुकृती सिद्धांत विशद करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२
(१) भरताचे रससूत्र
(२) क्षेमेंद्राचा औचित्यविचार

३. (अ) 'व्यंजना' ही शब्दशक्ती सविस्तर समजावून द्या. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२
(१) प्रतिमा
(२) रूपक

४. (अ) साहित्यनिर्मिती संदर्भात प्रतिमा शक्ती कसे कार्य करते. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२
(१) कोलरिजचा कल्पनाशक्ती सिद्धांत
(२) चमत्कृती शक्ती

५. (अ) भारतीयांच्या प्रयोजन विचाराची थोडक्यात चर्चा करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२
(१) प्रयोजन: जीवनभाष्य
(२) साहित्याचे प्रयोजन: आत्माविष्कार

TURN OVER

६. (अ) भट्ट लोल्लट व श्रीशंकूक यांनी मांडलेले रसविषयक विचार थोडक्यात स्पष्ट करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२

(१) रिचर्डस्‌चा समधाततेचा सिद्धांत

(२) कॅथार्सिस – विशुद्धाकरणवादी भूमिका

७. (अ) समीक्षेतील 'विश्लेषण' या घटकाचे महत्त्व विशद करा. १२

**किंवा**

(आ) टिपा लिहा: १२

(१) समीक्षेची उद्दिष्ट्ये

(२) मूल्यमापन प्रक्रिया

८. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतीही १६)** १४

(१) भरतमुनींचे रससूत्र सांगा.

(२) सर्जक अनुकृतीचा सिद्धांत कोणी मांडला?

(३) 'काव्यप्रकाश' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

(४) मम्मटांनी मांडलेली कोणतीही दोन काव्यप्रयोजने लिहा.

(५) 'विशिष्ट पदरचना रीति:' असे विधान कोणी केले आहे?

(६) साहित्यानिर्मितीसाठी प्रतिभेबरोबरच आणखी कोणत्या दोन गोष्टींचा उल्लेख संस्कृत काव्यशास्त्रात केला गेला?

(७) 'संभावनाविरह' ही संकल्पना कशाशी संबंधित आहे?

(८) लक्षणेचे दोन प्रकार सांगा.

(९) विभावांचे दोन प्रकार लिहा.

(१०) 'अर्थ क्रियोपेतम् काव्यम्' हे काव्यलक्षण कोणी मांडले आहे?

(११) जगन्नाथाच्या ग्रंथाचे नाव लिहा.

(१२) कोलरिजने कल्पनाशक्तीचे कोणते दोन प्रकार मानले आहेत?

(१३) शृंगार रसाचा मूळ स्थायी भाव कोणता?

(१४) वीर रसाचा मूळ स्थायी भाव कोणता?

(१५) बूचरने 'कॅथार्सिस' या संकल्पनेचा कोणता अर्थ सांगितला आहे?

(१६) प्लेटोने कोणत्या ग्रंथात त्याची अनुकृतीची कल्पना मांडली आहे?

(१७) समीक्षा व्यापाराची पहिली पायरी कोणती?

(१८) 'काव्यकौतुक' ग्रंथाचा कर्ता कोण?

(१९) उत्प्रेक्षा कशास म्हणतात?

(२०) अनुभाव म्हणजे काय?

---

**T .Y .B .A.**
**MARATHI LITERATURE**
**Literature and Society (Rev)**
**(Paper – VI)**
**{ 25th April 2016 }**

**QP Code : 27395**

सुधारित अभ्यासक्रम

(२½ तास) (एकूण गुण : ८०

सूचना : (१) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० (प्रत्येक प्रश्नास २५ गुण) आहेत.

१. (अ) 'संस्कृती' ची व्याख्या देऊन साहित्य-समाज परस्परसंबंधाची चर्चा करा.

**किंवा**

(ब) सामाजिक, सांस्कृतिक स्थितीगती आणि समकालीन विचारप्रणालीचा अभ्यास साहित्यकृतीच्या विश्लेषणासाठी दिशादिग्दर्शक कसा ठरतो? साधार चर्चा करा.

२. (अ) दलित साहित्यातील जाणिवांची चर्चा करून 'सूड' या कादंबरीचे दलित साहित्याच्या अनुषंगाने विश्लेषण करा.

**किंवा**

(ब) "'सूड' ही कादंबरी स्त्रीमनातील विद्रोहाला वाचा फोडते' या विधानाची सविस्तर चर्चा करा.

३. (अ) आत्मभान प्राप्त झालेल्या स्त्रीच्या स्व-विकासाची कहाणी जान्हवीच्या व्यक्तिरेखेतून कशी साकार होते याची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

(ब) मध्यमवर्गीय स्त्रीची कुटुंबव्यवस्थेत होणारी घुसमट 'अवकाश' या कादंबरीचा आशय कसा घडवते स्पष्ट करा.

४. (अ) ग्रामनिष्ठ समाज आणि संस्कृतीचे दर्शन कृष्णात खोत यांच्या 'गावठाण' या कादंबरीतून कसे घडते?

**किंवा**

(ब) गावठाणातील स्त्रीजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण आनंदीच्या व्यक्तिरेखेतून कसे घडते ते स्पष्ट करा.

...............

जुना अभ्यासक्रम

(२½ तास) (एकूण गुण : ८०

सूचना : (१) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
(२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL) विद्यार्थ्यांसाठी वेळ ३ तास व एकूण गुण १०० (प्रत्येक प्रश्नास २५ गुण) आहेत.

१. (अ) ''साहित्याचा आशय सामाजिक दृष्टिकोनातून विशद करणे म्हणजे साहित्याचा सामाजिक अभ्यास होय'' उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'साहित्य आणि समाज यांचे संबंध परस्परपूरक असतात.' या विधानाचे सोदाहरण स्पष्टीकरण करा.

२. (अ) महानगरीय वास्तवाचे कोणकोणते पैलू 'निष्पर्ण वृक्षावर भर दूपारी' या कादंबरीतून प्रगट झाले आहे. ते साधार लिहा.

**किंवा**

(ब) महानगरातील अर्थकेंद्री व्यवस्थेमुळे सामान्य माणसाला भोगाव्या लागणाऱ्या वेदनांचे चित्रण 'निष्पर्ण वृक्षावर भर दूपारी' या कादंबरीतून स्पष्ट करा.

३. (अ) जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर सेझच्या धोरणामुळे भुमिपुत्रांसमोर निर्माण झालेल्या समस्यांचे चित्रण 'एस ई झेड' कादंबरीतून कसे आले आहे ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) ग्रामीण साहित्य म्हणजे काय सांगून 'एसईझेड' कादंबरीत ग्रामीण अर्थकारण, राजकारण, यांचे चित्रण कसे आहे ते सविस्तर लिहा.

४. (अ) 'स्त्रीवाद' ही एक आत्मशोधाची विचारसरणी आहे ते स्पष्ट करून 'तिची कथा' मधील कथांचे स्त्रीवादी अंगाने मूल्यमापन करा.

**किंवा**

(ब) 'तिची कथा' या कथासंग्रहातून आधुनिक स्त्री मनाची विविध स्पंदने कशी प्रगट झाली आहेत ते साधार लिहा.

...............